दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स

संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १९३ । मंगळवार २१ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## गावठी कट्टा बाळगणारे दोघे उंबरे येथून ताब्यात

### एलसीबीच्या कारवाईत साडेपाच लाखांचा मुद्देमात जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने राहुरी तालुक्यातील उंबरे शिवारातून दोघांना गावठी कट्टा व दोन काडतुसांसह ताब्यात घेतले. विशाल वसंत पालवे (वय २८ वर्षे, रा. झापवाडी रोड, घोडेगांव, ता. नेवासा व सोमनाथ भानुदास मोरे (वय ३२ वर्षे, रा. शनिशिंगणापुर, ता. नेवासा) अशी त्यांची नावे आहेत.

दिनांक २० रोजी एलसीबीचे पथक राहुरी तालुक्यात अवैध अग्निशस्त्रांची माहिती काढत असतांना पथकास विशाल पालवे व सोमनाथ मोरे हे गोटुंबे आखाडा ते शनिशिंगणापूर रोडवर पांढऱ्या चारचाकी वाहनात विनापरवाना गावठी कट्टा कब्जात बाळगून फिरत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार पथकाने राहुरी



तालुक्यातील उंबरे शिवारातील एका हॉटेल परिसरात कारमध्ये थांबलेले असताना दोघांना ताब्यात घेतले.

त्यांच्याकडून कार, एक गावठी कट्टा व दोन काडतुसे असा एकूण पाच लाख ५२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत पोलीस कॉन्स्टेबल भगवान बाळासाहेब थोरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, विशाल तनपुरे, भगवान थोरात, रमिझराजा आतार, अरुण मोरे, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत यांनी केली.

## सागर ढिकले नेवाशाचे नवे ठाणेदार

### नेवासा पोलीस दलात खांदेपालट: अकार्यक्षमतेचा ठपका ठेवत वादग्रस्त पोलीस निरीक्षक महेश पाटील यांची गच्छंती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**नेवासा–** नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांची अखेर तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी कर्तव्यदक्ष आणि सिंघम म्हणून ओळख असलेले सागर ढिकले यांची वर्णी लागली आहे. पाटील यांच्या अकार्यक्षम कारभारामुळे आणि पोलीस ठाण्याचे स्वरूप धर्मशाळेसारखे केल्याच्या तक्रारींमुळे ही कारवाई झाल्याची चर्चा पोलीस वर्तुळात रंगली आहे.

**वरिष्ठांच्या नाराजीचा आणि अकार्यक्षमतेचा बसला फटका**

पोलीस निरीक्षक महेश पाटील यांचा नेवासातील कार्यकाळ सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात राहिला. त्यांनी केवळ नेवाशातच नाही, तर यापूर्वी जिथे जिथे काम केले, तिथे त्यांना अकार्यक्षम अधिकारी म्हणून ओळखले गेले. नेवासा पोलीस ठाण्यावर त्यांचे नियंत्रण सुटले असून त्यांनी ठाण्याला धर्मशाळा बनवले असल्याची टीका जनतेतून होत होती.

याबाबत नागरिकांनी वारंवार विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. विशेष म्हणजे, अप्पर पोलीस अधीक्षक (श्रीरामपूर विभाग) यांनी देखील पाटील यांच्या अकार्यक्षमतेबाबतचा स्पष्ट अहवाल वरिष्ठांना सादर केला होता. वरिष्ठांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही पाटील यांच्या कार्यपद्धतीत कोणतीही सुधारणा झाली नाही, परिणामी ही बदली करण्यात आली आहे.

**जनतेने सोडला सुटकेचा नि:श्वास**

गेल्या काही काळापासून नेवासा तालुक्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. गुन्हेगारांवर वचक बसवण्यात पाटील पूर्णपणे अपयशी ठरल्याने सामान्य जनता त्रस्त होती. आज त्यांच्या बदलीचे वृत्त समजताच नेवासातील जनतेने सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

**नूतन अधिकारी सागर ढिकले यांच्याकडून अपेक्षा**

नूतन पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्त झालेले सागर ढिकले हे त्यांच्या कडक शिस्त आणि डॅशिंग कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. पोलीस दलात त्यांची प्रतिमा एका सिंघम अधिकाऱ्याची आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे नेवासा तालुक्यातील अवैध धंद्यांना चाप बसेल आणि पोलीस दलाचा दरारा पुन्हा निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## नियमबाह्य पद्धतीने सभासदत्व नाकारणाऱ्या मर्चंटस बँकेला सहकार आयुक्तांचा दणका

### प्रणव कटारिया यांना तातडीने सभासदत्व बहाल करण्याचे आदेश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सहकार कायद्यानुसार सर्व तरतुदींचे पालन करीत सभासदत्वासाठी केलेला अर्ज नामंजूर करणाऱ्या अहमदनगर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँकेला महाराष्ट्र शासनाच्या सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाने दणका दिला आहे. बँकेचे सभासदत्व मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या प्रणव संजय कटारिया (रा. समता कॉलनी, विनायक नगर, अहिल्या नगर) यांना तात्काळ सभासदत्व बहाल करण्याचे आदेश अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहेत. या प्रकरणात अपिलार्थी प्रणव कटारिया यांच्या वतीने ॲड. सागर गुंजाळ यांनी प्रभावी युक्तिवाद केला. हा युक्तिवाद ग्राह्य धरत सहकार आयुक्तांनी बँकेने सभासदत्व नाकारण्यासाठी दिलेली कारणे अग्राह्य ठरवली.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रणव संजय कटारिया हे मर्चंटस बँकेचे खातेदार व ठेवीदार असून त्यांनी रितसर शुल्क भरून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २३ अन्वये बँकेच्या सभासदत्वासाठी अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज बँकेच्या संचालक मंडळाच्या दि. ७.१०.२०२५ च्या बैठकीत नामंजूर करण्यात आला. सदर निर्णयाविरुद्ध अपिलार्थी प्रणव कटारिया यांनी सहकार आयुक्त कार्यालयाकडे दि. ६.११.२०२५ रोजी अपिल दाखल केले. अपिलार्थीच्यावतीने युक्तिवाद यात नमूद करण्यात आले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १६० चे कलम २२ नुसार लागू केलेले खुले सभासदत्वाचे तत्व प्रतिवादी बँकेचे पोटनियम क्र.१० नुसार अटीची पूर्तता करणाऱ्या सर्व पात्र व्यक्तींना बँकेचे सभासदत्व प्राप्त करण्याचा अधिकार आहे. प्रतिवादी बँकेने लेखी म्हणणे सादर करीत अपिलार्थीने कलम २२ व पोटनियमातील तरतुदींची पूर्तता केली नाही तसेच बँकेकडून १ लाखांपेक्षा अधिक रकमेचे कर्ज घेतले नाही असा युक्तिवाद केला.

दोन्ही बाजूंच्या युक्तिवादांनतर सहकार आयुक्तांनी बँकेचा युक्तिवाद अमान्य करीत अपिलार्थी सभासदत्व मिळण्यास पात्र असल्याचे नमूद करीत निकालापासून १५ दिवसांच्या आत आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आदेश जारी केले.

या निकालावर प्रतिक्रिया देताना बँकेचे जागृत सभासद राजेंद्र चोपडा यांनी म्हटले की, मर्चंटस बँकेच्या संचालक मंडळाच्या मनमानी आणि

■ पान ४ वर

## रस्ते अपघात रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करा

### जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देशातील राष्ट्रीय महामार्गांवरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आणि कडक निर्देश जारी केले आहेत. त्या निर्देशांची जिल्ह्यात तात्काळ प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू करावी अशी मागणी रहदारी समस्येचे अभ्यासक अभय ललवाणी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की,राजस्थानातील फलोदी आणि तेलंगणातील रंगारेड्डी जिल्ह्यांमध्ये नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या भीषण अपघातांमध्ये ३४ जणांचा मृत्यू झाल्यानंतर न्यायालयाने स्वतः हून (सु-मोटो) या प्रकरणाची दखल घेतली होती.

न्यायालयाने या दुर्घटनांसाठी प्रशासनातील निष्काळजीपणा आणि पायाभूत सुविधांतील त्रुटी जबाबदार धरत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण () आणि संबंधित यंत्रणांकडून सविस्तर अहवाल मागवला होता. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाने १३ एप्रिल २०२६ रोजी काही महत्त्वपूर्ण निर्देश सरकारला दिले आहेत.

न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशांमध्ये १)

राष्ट्रीय महामार्गांवर अवैध पार्किंग बंद : कोणत्याही जड किंवा व्यावसायिक वाहनांना महामार्गावर थांबण्यास मनाई; फक्त निर्धारित जागीच पार्किंग,

२) अवैध बांधकामांवर कारवाई : महामार्गाच्या हद्दीत असलेल्या सर्व अनधिकृत धाबे, हॉटेल्स व व्यावसायिक बांधकामे ६० दिवसांत हटवण्याचे आदेश,

३) नियमित तपासणी व सर्वे

■ पान ४ वर

## आ. दातेंच्या नेतृत्वावर विश्वास

### अळकुटीतील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विकासाभिमुख कार्यशैलीवर आणि सर्वसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यावर विश्वास ठेवत कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे ओढा सातत्याने वाढत असल्याचे चित्र अळकुटी येथे पुन्हा एकदा नव्याने पाहायला मिळाले. अळकुटी येथील परंडवाल मळ्यातील कार्यकर्त्यांनी आज आमदार दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पारनेर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे प्रमुख उपस्थिती होते, पारनेर राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा रेश्मा गलांडे व मच्छिंद्र गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरेश काशिनाथ परंडवाल, सचिन कोडीभाऊ परंडवाल, तुकाराम सिताराम परंडवाल, जयराम शिवराम परंडवाल, प्रविण काशिनाथ परंडवाल, सुयश सुरेश परंडवाल यांनी पक्षाचा झेंडा हाती घेतला. या सर्वांनी आमदार दाते सरांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत विकासाच्या वाटचालीत सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला.

■ पान ४ वर

## भरता प्रमणे भाऊ अपेक्षित असेल तर स्वत: आधी राम व्हा - रामकथाकार डॉ. कुमार विश्वास

### रामकथेतील शबरी भेटीचे वर्णन ऐकून भाविकाचे डोळे पाणावले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राम कथा आपल्याला शौर्य, वचनबद्धता, भक्ती व बंधुप्रेम शिकवते. त्यामुळे ती कुटुंबासह श्रवण करणे महत्त्वाचे आहे. आपला भाऊ भरत सारखा आपल्याला अपेक्षित असेल तर आपण स्वतः आधी राम आहोत का हे तपासले पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांनी सोमवारी केले. यावेळी कथेत राम-भरत भेट आणि प्रभू रामाने शबरीची घेतलेली भेट या प्रसंगांचे वर्णन करताना स्वतः डॉ.विश्वास यांच्यासह भाविकांचेही डोळे पाणवले. उपस्थितांनाही गहिवरून आले.

माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या स्मृतीनिमित्त येथील काका ट्रस्ट व जगताप परिवाराचे वतीने आयोजित 'अपने अपने राम' या रामकथा प्रवचनात दुसरे पुष्प डॉ. कुमार विश्वास यांनी गुंफले. यावेळी बोलताना त्यांनी राम कथा सर्वांना माहीत आहे, परंतु ती प्रत्येकाच्या जीवनाशी कशी निगडित आहे हे जाणून घेणे महत्वाचे असल्याचे सांगितले.

दुसऱ्या दिवशीच्या कथेची सुरवातिला बडीसाजन ओसवाल संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, मंदारबुवा रामदासी, डॉ. हर्षवर्धन तमनर, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, धनश्री विखे, नानासाहेब फाटके, अनिल पोखरणा, मोहनलाल मानधना आदींच्या हस्ते श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमानाच्या मुर्त्यांचे पूजन



(छाया : सिद्धार्थ दीक्षित)

झाले. रामकथेचे विवेचन ऐकण्यासाठी शहरासह जिल्ह्यातून हजारो नागरिकांनी अलोट गर्दी केल्याने एक लाख स्क्वेअर फुटाचा भव्य मंडपही कमी पडला. त्यामुळे मंडपाच्या बाहेरही शेकडो भाविकांनी गर्दी केली होती. काका ट्रस्टचे कार्यकर्ते सर्व भाविकांसाठी व्यवस्था करण्यासाठी धावपळ करत होते. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप व आ.संग्राम जगताप यांनी सर्वांचे स्वागत केले.

डॉ.विश्वास पुढे म्हणाले, श्रीरामांना वनवासात धाडणारी माता कैकयी हिला सर्वांनी दोष दिला असला तरी खरे तर तिचे सर्वांनी आभार मानले पाहिजे. ती खलनायिका नाही. महालातील रामाला तिने सर्व सामान्यांचा राम केल्याने तिचे आभार मानले पाहिजे. तिच्यामुळे जगत कल्याण झाले, असे स्पष्ट

**जंगलातील महिलने छत्रपतींना दिला योग्य संदेश**

**यावेळी बोलताना डॉ विश्वास यांनी राम-शबरी भेटीच्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांनाही जंगलात राहणाऱ्या गरीब महिलेने युद्धनीतीचा संदेश दिल्याचा दाखला दिला. युद्ध मोहिमेवरून परतताना छत्रपती जंगलात राहणाऱ्या महिलेच्या कुटीत सैनिकांसह राहिले होते. कशा पद्धतीने शत्रूवर आक्रमण केले तर तुमच्या राजाला यश मिळेल याचा सल्ला तिने दिल्यावर ते ऐकून छत्रपतींनी त्यांची युद्धनीती बदलली व गुरिल्ला (गनिमी कावा) अंगीकारून शत्रूला जेरीस आणले व दिल्लीतील उंदराला औरंगजेबला महाराष्ट्रात आणून कुत्ते की मौत दिली, असेही डॉ. कुमार विश्वास यांनी सांगताच टाळ्यांचा कडकडाट झाला.**

करून डॉ. विश्वास म्हणाले, खरे तर रामायणात कोणीही खलनायक नाही. कैकयी, रावण, शूरपणखा ही सगळी व्यक्तिमत्व त्यांच्या कर्मातून जीवनात काय चांगले व काय वाईट याचे दाखले देतात. रावण हा अनाचार व अहंकाराचे प्रतीक आहे, शूरपणखा वासनेचे प्रतीक तर शबरी वात्सल्य दर्शवते, बिभीषण शरणागताचा उद्धार दर्शवतो, सुग्रीव मैत्रीची कर्तव्याची जाणीव देतो तर हनुमंत भक्तीची ताकद दाखवतो. या सर्वांचे परमेश्वरा प्रति असलेली भक्ती रामायणातून स्पष्ट होते. आधीच्या काळात देव स्वर्गात व दानव पातळात राहायचे, नंतरच्या काळात देव अयोध्येत व दानव लंकेत राहायचे. पुढच्या काळात देव-दानव हे पांडव व कौरव या एका कुळातच राहू लागले व आताच्या काळात देव आणि दानव दोघेही मानवी शरीरातच आहेत. त्यामुळे आपल्या शरीर व मनात चांगले की वाईट कृत्य करायचे याचा संघर्ष कायम सुरू असतो. त्यामुळे प्रत्येकाने ठरवले पाहिजे आपल्यातील देव जागवायचा की दानवाच्या आहारी जायचे ते, असे भाष्य कुमार विश्वास यांनी केले.


कथेत ते पुढे म्हणाले, वनवासातील रामाला भेटण्यासाठी भरत अनवाणी पायाने येत असताना त्याला पायात काटे टोचू नये म्हणून ते काढण्याची आज्ञा रामाने वनदेवीला दिली. त्या मागचे कारण भरतातील राम भक्तीची जाणीव रामाला होती. त्यामुळे आपल्या कुटुंबात जर आपले भाऊ भरतासारखे असणे अपेक्षित असेल तर रामा सारखी संवेदना त्यांच्याविषयी आपण जपतो का याचेही आत्मपरीक्षण करायला हवे. असे आवाहन केले.

डॉ. विश्वास यांनी राम कथेचे अनुषंगाने दिलेले जीवन दाखले टाळ्यांची दाद मिळवून गेले. मुघल आक्रमकांनी रामाचे मंदिर तोडले तरी आमच्या हृदयातील राम तुम्ही तोडू शकत नाही. मृत्यूचे भय दूर करण्याचे काम राम कथा करते. अरुणकाका शरीराने जरी अस्तित्वात नसले

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### भाऊसाहेब फिरोदियामध्ये अकरावी ऑनलाइन प्रवेश फॉर्म भरण्याची मोफत सुविधा



अहिल्यानगर- भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात मोफत उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती अहमदनगर एज्यूकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी दिली.ज्या विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिलेली आहे, अशा विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी मध्ये प्रवेश घेण्यासाठी गतवर्षीपासून पूर्णपणे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवायला सुरुवात झालेली आहे. गतवर्षी विद्यार्थ्यांचा मोठा गोंधळ उडाल्याने अनेक विद्यार्थ्यांना त्याचा त्रास झाला आणि पालकांना आर्थिक झळ बसली होती. यामुळेच या वेळेला शासनाकडून ही प्रक्रिया लवकर सुरू करण्यात आलेली आहे. असे असले तरी विद्यार्थ्यांना या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये अनंत अडचणी येतात त्यांच्याकडून चुका होतात, आणि चुकीचे फॉर्म भरल्यामुळे पुढे प्रवेशासही अडचण निर्माण होते. या सगळ्या गोष्टी टाळण्यासाठी संस्थेच्यावतीने पुढाकार घेऊन सर्व विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सेवा तसेच मोफत समूपदेशन उपलब्ध करून देण्यात आलेले असल्याची माहिती प्राचार्य उल्हास दुगड यांनी दिली.या ऑनलाइन प्रवेशामध्ये सुरुवातीला विद्यार्थ्यांचा भाग १ भरावयाचा असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे सकाळी १० ते ४ या वेळेत उपस्थित रहावे तसेच अधिक माहितीसाठी ९३२५१०९८२९ व ९०९६२४४१७८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन उच्च माध्यमिक विभागाचे विभाग प्रमुख राजेंद्र जाधव यांनी केले आहे.

### ढवळपुरीच्या के.के. रेंज परिसरातील अवैध माती उत्खननाविरोधात कारवाई करा

अहिल्यानगर- पारनेर तालुक्यातील मौजे ढवळपुरी येथील के.के. रेंज (आर्मी) हद्दीत मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले अवैध माती व मुरूम उत्खनन तात्काळ थांबविण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. वारंवार तक्रारी करून तसेच ग्रामपंचायतीने ठराव पाठवूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांसह ढवळपुरी ग्रामपंचायत कार्यालयासमोर शुक्रवारी (दि. १७ एप्रिल) उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे. ढवळपुरी गावठाणालगत असलेल्या के.के. रेंज परिसरात देशातील महत्त्वाचे लष्करी प्रशिक्षण केंद्र आहे. अशा संवेदनशील ठिकाणीच मोठ्या प्रमाणावर मातीचे अवैध उत्खनन आणि वाहतूक सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. २७ जानेवारी रोजी ग्रामपंचायत ढवळपुरीने तहसीलदार, पारनेर यांना लेखी निवेदन देऊन अवैध उत्खनन थांबवण्याची मागणी केली होती. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. गेल्या दोन वर्षांपासून या प्रकरणी सातत्याने पाठपुरावा सुरू असूनही महसूल व पोलीस प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. काही वेळा लष्कर विभागाने अवैध वाहने पकडून पोलिसांच्या ताब्यात दिली, तसेच पारनेर पोलिसांनीही काही वाहने जप्त केली. मात्र, पुढील कारवाईसाठी ही वाहने महसूल विभागाकडे हस्तांतरित करणे अपेक्षित असताना ती सोडून देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, अवैध माती वाहतुकीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून काही दिवसांपूर्वी अशाच एका वाहनाच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीने तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयाला वारंवार पत्रव्यवहार करूनही जाणीवपूर्वक कारवाई टाळली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हास्तरावर विशेष पथक नेमून अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# अहिल्यानगरात वाहतुकीचा खेळ खंडोबा

**शहर वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी नगर-मनमाड बायपास व नगर संभाजी नगर बायपास परिसरात वाहन चालकाकडून पैसे गोळा करण्यात मग्न**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** २० रोजी भर दुपारी दोन वाजन्याच्या सुमारास इंडस्ट्रीज परिसरा पासून सक्कर चौकापर्यंत मोठ्या प्रमाणात दूतर्फा वाहतूक जाम झाली होती. हा पुणे महामार्गावरील अतिशय महत्त्वाचा मार्ग असल्याने येथे नेहमीच वाहनांची मोठी वर्दळ असते मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊनही शहर वाहतूक शाखेचा एकही कर्मचारी किंवा अधिकारी घटनास्थळी दिसून आला नाही.

रस्त्यावर भर उन्हात नागरिक हैराण वाहतूक कोंडी सोडवायला कोतवाली पोलिसांनी घेतली धाव वाहतूक शाखेतील पोलीस वेगळ्या ठिकाणी मग्न असताना कोतवाली पोलिसांनी दाखवलेली जबाबदारी आणि कार्य तत्परता पाहून नागरिकांनी त्यांचे कौतुक केले वाहतूक शाखेतील कर्मचारी गायब असताना कोतवाली पोलिसांनी येऊन तात्काळ वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्या आली नगर शहरात दिवसें दिवस गंभीर बनत चालली असून शहर वाहतूक शाखेच्या निष्क्रिय कारभारा मुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

त्यामुळे वाहनचालक प्रवासी तसेच नागरिकांना दोन ते तीन तासभर उन्हात अडकून राहण्याची वेळ आली. विशेष म्हणजे या वाहतूक मध्ये अम्बुलन्स देखील अडकल्याचं पाहायला मिळालं. सध्या तापमानाचा पारा चढलेला असताना जिल्हाधिकाऱ्यांनी सकाळी १० ते सायंकाळी चार यावेळेत गरज नसल्यास घराबाहेर पडू नये अस आव्हान केलय. मात्र वाहतूक शाखेच्या भोंगळ नियोजनामुळे नागरिकांना उन्हाचा तीव्र तडाका सहन करत वाहतूक कोंडी मध्ये थांबावे लागले त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान शहर वाहतूक शाखा निष्क्रिय असताना कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह स्वतः रस्त्यावर उतरून कायनेटिक चौक परिसरात वाहतूक कोंडी नियंत्रण केले. त्यांनी तात्काळ हालचाल करतून वाहतूक सुरळित केली. शहर वाहतूक शाखा कोमत असताना कोतवाली पोलिसांनी दाखवलेली तत्परता पाहून नागरिकांनी पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड व त्यांच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

मात्र शहर वाहतूक शाखेच्या निष्क्रितेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत बायपास चौकात गरज नसताना चार पाच पोलीस कर्मचारी वाहन चालका कडून पैसे गोळा करण्यात मग्न असतात जर पोलीस स्टेशन चे कर्मचारी वाहतूक कोंडी सोडवत असतील तर वाहतूक नियंत्रण कक्ष बंद करून टाका असी मागणी नागरिकांकडून व्यक्त होत आहेत.

# समांतर रंगभूमी कलावंत संघटनेची अधिकृत नोंदणी

**कलावंतांच्या न्याय हक्कांसाठी राज्यस्तरीय नवे व्यासपीठ**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्रातील समांतर, प्रायोगिक आणि हौशी रंगभूमीवर कार्यरत असलेल्या कलावंतांसाठी स्थापन करण्यात आलेल्या समांतर रंगभूमी कलावंत संघटनेची अधिकृत नोंदणी पूर्ण झाली असून, कलावंतांच्या न्यायहक्कांसाठी राज्यस्तरावर नवे व्यासपीठ निर्माण झाले आहे. शासनाच्या विविध स्पर्धा, अनुदान योजना, सांस्कृतिक महोत्सव तसेच निवड प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, निर्णय प्रक्रियेतील अस्पष्टता आणि कलावंतांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात संघटित व कायदेशीर लढा उभारण्याच्या उद्देशाने या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे.

यापूर्वी अस्तित्वात असलेल्या अनेक संस्था धर्मादाय कायद्यांतर्गत नोंदणीकृत असल्यामुळे त्यांच्या कार्यावर काही कायदेशीर मर्यादा येत होत्या. त्यामुळे कलावंतांच्या प्रश्नांवर ठोस आणि प्रभावी भूमिका घेणे कठीण होत होते. ही बाब लक्षात घेऊन स्वतंत्र, सक्षम आणि कायदेशीरदृष्ट्या भक्कम संघटना उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यापुढे कलावंतांवर कुठल्याही बाबतीत अन्याय झाला, त्यांचे हक्क डावलले गेले, तसेच तंत्रज्ञ व बॅकस्टेज कलावंतांचे प्रश्न निर्माण झाले किंवा त्यांच्यावर अन्याय झाला, तर त्या बाबतीतही संघटना ठामपणे लढा उभारणार आहे.

या संघटनेच्या माध्यमातून कलावंतांचे संघटन, शासनाच्या योजनांमध्ये पारदर्शकता, स्पर्धा व महोत्सवातील न्याय्य प्रक्रिया तसेच कलावंतांच्या हक्कांचे संरक्षण यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार आहेत.

कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष डॉ. श्याम शिंदे (अहिल्यानगर), सचिव दिनेश कवडे (नांदेड)उपाध्यक्ष (प्रशासकीय) संजय भाकरे (नागपूर), उपाध्यक्ष (उपक्रम) अरुण कदम (मुंबई), सहसचिव सागर लोधी (पुणे), कोषाध्यक्ष विक्रम गवांदे (नाशिक), संघटक विजय चव्हाण (सिंधुदुर्ग) संघटक डॉ. मीरा शेंडगे (सोलापूर), सल्लागार अशोक हंडोरे (कल्याण), सदस्य किरण लोंढे (सोलापूर) सदस्य डॉ. गणेश शिंदे (धाराशिव), राज्यातील विविध भागांतील पदाधिकाऱ्यांचा सहभाग असल्यामुळे ही संघटना राज्यभर कार्यरत राहणार असल्याचे सांगण्यात आले. सध्या महाराष्ट्रातील २२० संस्था अनौपचारिकरित्या संघटनेत समाविष्ट असून, त्यांना लवकरच अधिकृत संलग्नता देण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर प्रतिनिधी नियुक्त करून सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती संघटनेतर्फे देण्यात आली.


''गेली ४० वर्षांपासून मी सलग रंगभूमीवर कार्यरत आहे. आजपर्यंत मी ३८ मराठी, २१ हिंदी नाटकांचे दिग्दर्शन केले आहे. या माध्यमातून मला २१ राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. लेखन, प्रकाशयोजना व सांस्कृतिक क्षेत्रातील भरीव कार्याची दखल घेऊनच मला समांतर रंगभूमी कलावंत संघटनेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदाची संधी मिळाली, याचा मला आनंद आहे.

# कॉर्फबॉल विश्वचषक स्पर्धेसाठी दिशान गांधी याची भारताच्या संघात निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कॉर्फबॉल खेळात आपल्या कौशल्याने देशभरात नावलौकिक मिळवणाऱ्या अहिल्यानगरच्या दिशान गांधी याची कॉर्फबॉल विश्वचषक स्पर्धेसाठी पुन्हा एकदा भारतीय संघात निवड झाली आहे. बीच कॉर्फबॉल प्रकारात होणारी ही विश्वचषक स्पर्धा १ मे पासून बँकॉक येथे रंगणार आहे. महाराष्ट्रातून एकमेव दिशान गांधी याची भारतीय संघात निवड झाली आहे.

दिशान यापूर्वी आशिया ओशियाना स्पर्धेत भारताकडून खेळला होता. कॉर्फबॉल हा खेळ सध्या उत्तर भारतात तसेच दक्षिण भारतात चांगलाच प्रचलित झाला आहे. बास्केटबॉल सारख्या या अनोख्या खेळाची आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती वाढत आहे. मुले व मुली एकत्र संघात असणारा हा एकमेव खेळ आहे. या खेळात खेळाडूंच्या फिटनेसचा कस लागत असतो.



बीच कॉर्फबॉल हा खेळ समुद्राच्या किनारी लाटांच्या सान्निध्यात आणि मऊशार वाळू/ मातीच्या मैदानात खेळला जातो. दिशान गांधी यांच्या प्रयत्नामुळे नगरमध्ये पेमराज सारडा महाविद्यालयात कॉर्फबॉलचे पहिलेवहिले मैदान साकारण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशन या खेळाच्या प्रचार प्रसारासाठी विशेष प्रयत्न करत आहे. नुकत्याच झालेल्या राज्य पातळीवरील स्पर्धेत नगर जिल्हा संघाने रजत पदक मिळवण्याची कामगिरी केली आहे. नगरमधील कनिष्ठ गटातील काही खेळाडू देशपातळीवर खेळत आहेत. दिशानने कॉर्फबॉलसह क्रिकेट, बास्केटबॉल या खेळातही मोठी कामगिरी करत वैयक्तिक तसेच सांघिक पदके जिंकली आहेत.

कॉर्फबॉल विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाचे सराव शिबिर जयपूर येथे होणार असून एक मे रोजी दिशानसह भारतीय संघ दिल्लीहून बँकॉकला रवाना होणार आहे. दिशान हा माजी क्रिकेटपटू व मर्चंटस बँकेचे माजी अधिकारी किशोर गांधी व दिशान ॲडव्हर्टायझिंगच्या संचालिका बबिता गांधी यांचा मुलगा आहे. अहिल्या नगर कॉर्फबॉल असोसिएशनचे अध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, उपाध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य, खेळाडू, हितचिंतक, मित्र परिवाराने या निवडीबद्दल दिशानचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# धर्मवीर संभाजी महाराजांच्या बलिदान दिनानिमित्त भवानी मराठा महिला ग्रुपतर्फे आदरांजली वाहण्यात आली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त सावेडी येथील धर्मवीर चौक (प्रोफेसर चौक) येथे भवानी मराठा महिला ग्रुपतर्फे महाराजांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन ग्रुपच्या अध्यक्षा माधवी दांगट यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी प्रियांका म्हस्के, निलिमा म्हस्के, सुजाता पायमोडे, मनीषा भोसले, सुरेखाताई सांगळे, बापू ठाणगे, दत्ता वामन, प्रतिभा कदम, अमृता वाकळे, पूजा पवार, शैला बेल्हेकर, सारिका जाधव यांच्यासह अनेक महिला सदस्य उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेचा गौरव करत त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

या दिवशी छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिन अमावास्येला साजरा केला जातो. त्यामुळे दर अमावास्येला



छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहिली जाते ही परंपरा जपली जात आहे. धर्मवीर चौक ( प्रोफेसर चौक) येथे

अधिकाधिक नागरिकांनी अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन धर्मवीर संभाजी महाराजांना आदरांजली वाहावी तसेच ग्रुपच्या अध्यक्षा माधवी दांगट म्हणाले की, महिलांना स्वतःचे रक्षण करण्यासाठी लाठी, काठी आणि दंड साखळी चे लवकरच शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

# प्रा.वीरेंद्र शंकर धनशेट्टी यांना विद्यावाचस्पती पदवी प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ. वीरेंद्र शंकर धनशेट्टी यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथून विद्यावाचस्पती पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या संशोधन कार्याला विद्यापीठाने मान्यता देत ही पदवी बहाल केली.



धनशेट्टी यांनी ''पारनेर तालुक्यातील राजकारणाचा चिकित्सक अभ्यास : कालखंड विशेषतः १९६० ते २०१४'' या विषयावर संशोधन केले. या संशोधनामध्ये पारनेर तालुक्यातील राजकीय घडामोडी, स्थानिक नेतृत्व, निवडणूक प्रक्रिया आणि सामाजिक-राजकीय बदलांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

या संशोधन कार्यासाठी त्यांना प्रा. डॉ. ज्योती पापा बीडलान यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हे संशोधन पूर्णत्वास गेले.

या उल्लेखनीय यशाबद्दल धनशेट्टी वीरेंद्र शंकर यांचे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा. श्री.रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील , सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे पाटील, ज्येष्ठ विश्वस्त सितारामजी खिलारी तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# सिस्पे इन्फिनिटी बिकन प्रकरणात न्यायासाठी बेमुदत आमरण उपोषण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सिस्पे इन्फिनिटी बिकन या आर्थिक फसवणूक प्रकरणात न्याय मिळावा, तसेच पोलीस तपासातील कथित अकार्यक्षमतेविरोधात ठेवीदारांनी सुरू केलेले बेमुदत आमरण उपोषण चौथ्या दिवशीही सुरूच असून प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस दखल घेतलेली नाही.

गेल्या आठ महिन्यांपासून या प्रकरणात न्यायालयीन तसेच आंदोलनात्मक पातळीवर लढा सुरू असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले. मात्र, पोलीस प्रशासनाकडून अद्यापही मूलभूत मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये कंपनीचे संचालक अगस्ती मिश्रा, नवनाथ जगन्नाथ अवताडे, विनोद बबन गाडीलकर, विक्रम बबन गाडीलकर आणि संदीप संपत दरेकर यांना तात्काळ



अटक करण्याची मागणी आहे. तसेच अटकपूर्व जामीन अर्ज दाखल करून जाणीवपूर्वक अटकेपासून संरक्षण मिळवणाऱ्यांवर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

शुभम अवताडे व सुवर्णा अवताडे यांचे जामीन अर्ज फेटाळण्यात आले असतानाही त्यांना अटक का करण्यात आलेली नाही, याबाबत प्रशासनाने स्पष्टीकरण द्यावे, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. याशिवाय, एलएलपी स्वरूपात नोंदणीकृत संबंधित कंपन्यांच्या संचालकांनाही अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे तपासादरम्यान जप्त करण्यात आलेली रक्कम तात्काळ पीडित गुंतवणूकदारांना परत करण्यात यावी, तसेच गुंतवणूकदारांच्या वतीने न्यायालयीन कामकाज पाहणारे अँड. शुभम रमेशराव साके-पाटील यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशीही मागणी आहे.

या सर्व मागण्यांसाठी १६ एप्रिलपासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे. या उपोषणात बाबा आप्पा दराडे, अनिल सुभाष तरटे, गोवर्धन गोरक्षनाथ मगर यांच्यासह मोठ्या संख्येने ठेवीदार सहभागी झाले आहेत.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरात २५ एप्रिलला 'राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२६'चे आयोजन



अहिल्यानगर- जिल्ह्यातील नामांकित राजस्व स्पोर्ट्स क्लबतर्फे विविध क्रीडा उपक्रम सातत्याने राबविले जात असून, यंदा शनिवार, दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी 'राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२६'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अहिल्यानगरमधील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तसेच जिल्ह्यातील सर्वात मोठ्या सिंथेटिक स्केटिंग रिंगवर पार पडणार आहे. स्पर्धा ४, ६, ८, १०, १२ वर्षे वयोगटांसह खुल्या गटात आयोजित करण्यात येणार असून, टेनासिटी, क्वाड, रिक्रिएशन इनलाईन व प्रोफेशनल इनलाईन अशा विविध प्रकारांमध्ये मुले व मुलींसाठी सामने होणार आहेत.या स्पर्धेचा उद्देश स्केटिंग खेळाडूंचा वेग, कौशल्य आणि सर्वांगीण विकास साधणे तसेच जिल्ह्यातील स्केटिंग खेळाचा दर्जा उंचावणे हा आहे, अशी माहिती क्लबचे संस्थापक संचालक चेतन सहाणे यांनी दिली.स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांनी सन्मानित करण्यात येणार असून, सर्व सहभागी खेळाडूंना प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे.स्पर्धेचे ठिकाण प्रेमदान चौक, धर्माधिकारी मळा, लिटिल फ्लॉवर स्कूलजवळील राजस्व स्पोर्ट्स क्लब येथे असून, स्पर्धेला दुपारी ३ वाजता प्रारंभ होणार आहे.नोंदणीची अंतिम मुदत शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध शाळा व स्केटिंग अकॅडमीतील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय खेळाडू प्रशांत पाटोळे यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ८०८७८७०८९९ किंवा ८६००००९७७७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### भोंदूगिरीविरोधात राज्यव्यापी मोहीम राबवा; कडक कारवाईची मागणी

अहिल्यानगर - महाराष्ट्रात अंधश्रद्धा, भोंदूगिरी



आणि त्यातून होणाऱ्या महिला व अल्पवयीन मुलींच्या शोषणाच्या घटना वाढत असून, अशा सर्व प्रकारांवर शासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे.गेल्या महिन्याभरात राज्यभर गाजलेल्या भोंदू कॅप्टन अशोक खरात प्रकरणामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विशेषतः महिलांवरील लैंगिक शोषण, अत्याचार आणि फसवणुकीच्या घटनांमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणातून जनतेला वास्तव समजले असले, तरी अशाच प्रकारे काळी जादू, चमत्कार, भविष्यवाणी, अंकज्योतिष किंवा 'देवाचे अवतार' असल्याचा दावा करून लोकांची फसवणूक करणारे अनेक भोंदूबाबा आजही सक्रिय असल्याचा आरोप सिरसुल यांनी केला.त्यांनी पुढे म्हटले की, काही भोंदूंचे राजकीय नेते, मंत्री, वरिष्ठ अधिकारी तसेच समाजातील प्रभावशाली व्यक्तींशी संबंध असल्यामुळे त्यांचा दबदबा वाढला. त्यामुळे त्यांच्या विरोधातील लैंगिक शोषण, अत्याचार, विनयभंग आणि आर्थिक घोटाळ्यांची माहिती असूनही पीडितांनी तक्रार करण्यास धजावले नाही. ''राजकीय पाठबळामुळे न्याय मिळणार नाही,'' या भीतीमुळे अनेक महिला पुढे आल्या नाहीत, हे वास्तव आता उघड झाले आहे. काही उच्चपदस्थ अधिकारी व नेत्यांचे अशा व्यक्तींसोबतचे फोटो समोर आल्याने सामान्य जनतेतही संताप व्यक्त होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

धर्मांतर, ड्रग्स प्रकरणे, अश्लील व्हिडिओद्वारे ब्लॅकमेलिंग आणि महिलांवरील वाढते अत्याचार या गंभीर बाबींवर नियंत्रणासाठी कडक कायदे करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे,

# ७५ पार महिलांचा उत्साहपूर्ण सत्कार; माहेश्वरी महिला मंडळाचा अनोखा सोहळा

**ज्येष्ठ महिलांचा भावपूर्ण सत्कार माहेश्वरी महिला मंडळ सावेडी, अहिल्यानगरचा उपक्रम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** १२ एप्रिल रोजी प्रेमराज सारडा कॉलेजच्या बहुउद्देशीय हॉलमध्ये एक अनोखा सोहळा संपन्न झाला.माहेश्वरी समाजातील ७५व त्यापेक्षा जास्त वय असलेल्या ४० महिलांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सुनंदा सोमाणी, वर्तमान अध्यक्षा स्नेहलता सोमाणी, प्रमुख अतिथी ललिताजी मालपाणी, कार्यक्रमाच्या अध्यक्षा जिल्हाध्यक्षा अनुराधाजी राठी,बसंती बाई काकानी यांच्या उपस्थितीत व प्रकल्प प्रमुख स्मिता सारडा, निर्मला बंग यांच्या हस्ते दीप प्रज्वलन होऊन कार्यक्रमास प्रारंभ झाला.

कार्यक्रमांच्या प्रारंभी सर्व ज्येष्ठ महिलांचा फुलांची उधळण करत स्वागत करण्यात आलं. त्यानंतर च्या भरगच्च कार्यक्रमात महिलांनी वेलकम ड्रिंक, नाश्ता, चहा, भोजन यांचा आस्वाद घेतला. सुंदर भेटवस्तू देऊन त्यांचे आशिर्वाद घेतले गेले. गाण्यावर आधारित छान छान रिल्स बनवण्यात आल्या. या वयात ही सर्व महिला अत्यंत उत्साहाने कोरिओग्राफर ने दाखवल्याप्रमाणे हुबेहूब कृती आणि अभिनय करत होत्या. रील बनवत असताना महिलांचा आनंद खरोखरच बघण्यासारखा होता. किशोरी बिहाणी, प्रतिभा बजाज,पुष्पा अट्टल, समता दमाणी यांनी रील बनविण्यासाठी परिश्रम घेतले.

श्यामा मंत्री यांनी बहारदार सूत्रसंचालन केले, कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी ऊषा बजाज, सुषमा काकाणी, सुनिता सोमाणी, वैशाली मालपाणी, शशिकला सोनी, अलका नावंदर, सविता बंग, शोभा काकाणी, अनुराधा काकाणी ,सुनिता सिकची, सरला स्वामी यांनी परिश्रम घेतले.

ललिताजी मालपाणी यांनी आपली संस्कृती,परंपरा यांचा मान राखत नवीन पिढीबरोबर आपणही बदलले पाहिजे असा मोलाचा सल्ला आपल्या भाषणात दिला.जिल्हाध्यक्ष अनुराधाजी राठी यांनी संघटन चे महत्व पटवून दिले.

मंडळाच्या आतापर्यंत च्या वाटचालीबद्दल सौ.सुनंदा सोमाणी यांनी तर प्रोजेक्ट बद्दल सौ.स्मिता सारडा यांनी माहीती दिली. आभार प्रदर्शन सौ. निर्मला बंग यांनी केले.

आयोजकांनी केलेलं परिपूर्ण आदरातिथ्य, प्रेमाने आणि आदराने केलेली विचारपूस यामुळे आलेल्या सर्व ज्येष्ठ महिला भारावून गेल्या होत्या. हा कार्यक्रम आपल्याला खूपच आवडला आणि इथून छान छान आठवणी घेऊनच आम्ही घरी परत जात आहोत, अशा प्रतिक्रिया त्यांनी दिल्या.

# सहकारमहर्षी स्व. सुवालाल गुंदेचांनी बँकिंग क्षेत्रासाठी दिलेले योगदान दिशादर्शक - किरण काळे

**जयंती निमित्त अभिवादन सभा संपन्न**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सहकार महर्षी स्व. सुवालाल गुंदेचा हे तपस्वी होते. त्यांनी आयुष्यभर सामाजिक कार्यासाठी स्वतः ला वाहून घेतले होते. बँकिंग क्षेत्रामध्ये त्यांनी दिलेले योगदान सहकारासाठी आदर्शवत आणि दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे. स्व. गुंदेचा यांच्या जयंती निमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी संजय झिंजे, मनोज सुवालाल गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, अनंत गारदे, रावजी नांगरे, पै. दीपक भोसले, सुशांत म्हस्के, प्रतीक बारसे, राम वाणी, राम झिने, प्रा. अमोल खाडे, रोहन शेलार, मतीन शेख, विकेश गुंदेचा, गणेश आपरे, शंकर आव्हाड, नलिनी गायकवाड, नीता बर्वे, अर्चना गायकवाड, शारदा वाघमारे, उषा भगत, शैला लांडे, रजनी ताठे, मीना रणशूर, रूपाली आपरे, लोकेश बर्वे, विजय शिरसाठ, चंद्रकांत उजागरे, जयराम आखाडे, विनोद शिरसाट, राम धोत्रे, सोनू देशमुख, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, निलेश लांडे, आप्पासाहेब लांडगे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते, स्व. गुंदेचा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किरण काळे म्हणाले की, सुवालालजींनी बँकिंग क्षेत्रामध्ये कायम चांगल्या लोकांना संधी देण्याचे काम केलं. बँकेचा कारभार आदर्शवत चालवला. आज ते हयात नाहीत. मात्र त्यांचे विचार जिवंत आहेत. त्यांचे चिरंजीव मनोज गुंदेचा हे त्यांच्या विचारांचा वारसा समर्थपणे पुढे चालवत आहेत. सुवालालजीं प्रमाणेच प्रामाणिकपणा, निष्ठा, पारदर्शकता आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी त्यांच्यामध्ये तळमळ आहे. मनोज गुंदेचा आज जैन समाजाच बँकिंग, सामाजिक व राजकीय क्षेत्रात समर्थपणे करत आहेत.

यावेळी मनोज गुंदेचा म्हणाले की, स्व. सुवालाल भाऊंनी आयुष्यभर प्रामाणिकपणे समाजाची सेवा केली. सहकार आणि बँकिंग क्षेत्रामध्ये त्यांनी निर्माण केलेले मापदंड आजच्या पिढीसाठी दिशा देणारे आहेत. बँकिंग क्षेत्र सातत्यपूर्ण ग्राहकांना उत्तम सेवा देण्यामध्ये अग्रेसर राहायचे असेल तर व्यवहारांमध्ये शतप्रतिशत पारदर्शकता असायला हवी, हा त्यांचा आग्रह आज आम्हाला सहकारामध्ये काम करत असताना अडचणीच्या परिस्थितीमध्ये सातत्याने दिशा देत असतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय झिंजे यांनी केले. आभार प्रतीक बारसे यांनी मानले.

# मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास व्हावा - आ. काशिनाथ दाते सर

**कुरुंद येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात विकासकामांना वेग देत सर्वसामान्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते व प्रमुख उपस्थितीत कुरुंद येथे विविध विकासकामांच्या भूमिपूजनाचा सोहळा संपन्न झाला. या उपक्रमामुळे गावाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी भर पडणार असून, स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रसंगी आमदार दाते सर म्हणाले की, ''विकास हा केवळ कागदावर वा भाषणापुरता मर्यादित न राहता तो प्रत्येक गावापर्यंत आणि गावातील प्रत्येक माणसापर्यंत पोहोचलाच पाहिजे, हा माझ्या आजवरच्या राजकीय वाटचालीतील कायमचा



ध्यास आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे हेच माझे खरे ध्येय आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास करताना कुणीही वंचित राहणार नाही. ह्याची मी कायम दक्षता घेत आलोय व घेत राहील. ' '
त्यांनी पुढे सांगितले की, शिक्षण, रस्ते, सामाजिक सुविधा आणि धार्मिक स्थळांचा विकास या माध्यमातून ग्रामीण भाग अधिक सक्षम करण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. विकासकामांमध्ये पारदर्शकता व गुणवत्ता राखत कामे वेळेत पूर्ण करण्यावरही आपण कायम भर दिला असून सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावरील समाधानातच माझ्या राजकीय व सामाजिक वाटचालीची फलश्रुती दडलेली आहे. यावेळी जयसिंगराव कर्डीले, आरपीआय पारनेर तालुका अध्यक्ष राजेंद्र उबाळे, अशोक कर्डीले सर, दशरथदादा कुलाळ, विकास पवार, संतोष डोंबाळे, अर्जुन रासकर, बाबासाहेब कोतकर, मधुकर उबाळे, रघुनाथ भोसले, गौतम गायकवाड, सुधाकर उबाळे, कैलास उबाळे, नंदुशेठ खामकर, कैलास कोठावळे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विकासकामांमुळे कुरुंद गावाच्या प्रगतीला नवी दिशा मिळणार असून, आमदार दाते सरांच्या समाजाभिमुख कार्यपद्धतीमुळे सर्वसामान्यांमध्ये विश्वास अधिक दृढ होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# खरी सभा मी विजयाचीच घेणार यातून त्यांनी विजय निश्चित असल्याचा संदेशच दिला

**चार तारखेला निकाल, चार तारखेलाच वाढदिवस । मुंडे यांची टायमिंगवर खेळी; विजयाची घोषणा आधीच गुलाल आपलाच**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**राहुरी–** निवडणूक रणधुमाळीत मंत्री पंकजा मुंडे यांनी भाषणातून आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका घेत थेट विजयाचा सूर लावला. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणी जागवत त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण केला.सभेतील सर्वात चर्चेचा मुद्दा ठरला तो त्यांचा चार तारखेचा फॉर्म्युला चार तारखेला निकाल आहे आणि त्याच दिवशी अक्षयचा वाढदिवस आहे! आशीर्वाद द्यायचा असेल, तर



विजय द्या या विधानाने सभेत एकच जल्लोष उसळला. मुंडे यांनी केवळ भावनिक नव्हे तर आत्मविश्वासपूर्ण भूमिका घेत स्पष्ट इशारा दिला आज सभा घेत आहे पण खरी सभा मी विजयाचीच घेणार यातून त्यांनी विजय निश्चित असल्याचा संदेशच दिला. कर्डीले साहेबांचा विकासाचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आता अक्षयवर असल्याचे सांगत त्यांनी मतदारांना थेट निर्णय घेण्याचे आवाहन केले. विकास थांबवायचा की पुढे न्यायचा, हे आता जनतेच्या हातात आहे, असे त्यांनी ठणकावले. एकीकडे भावनिक मुद्दे, तर दुसरीकडे अचूक टायमिंग आणि विजयाचा आत्मविश्वास या दुहेरी रणनीतीने मुंडे यांनी निवडणुकीत आक्रमक वातावरण निर्माण केल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

# अहमदनगर मर्चंटस बँकेच्या दाळमंडई येथील विस्तारीत हेड ऑफीस अनेक्सचा शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बँकिंगी क्षेत्रात तीव्र स्पर्धा असल्याने ग्राहकांना जास्तीत जास्त अत्याधुनिक बँकिग सोयी सुविधा देणे आवश्यक बनले आहे. अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेने बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली दीर्घकाळ यशस्वी वाटचाल करताना नेहमीच अत्याधुनिक तंत्रज्ञान युक्त सेवा देण्यावर भर दिला आहे. आताच्या युगातील डिजिटल बँकिग सुविधा मर्चंटस बँकेने कार्यान्वित केल्या आहेत. या जोडीलाच बँकेचा प्रशासकीय कारभार अधिक गतिमान व तत्पर करण्यासाठी हेड ऑफिसचा विस्तार करीत दाळमंडई येथे हेड ऑफीस अनेक्स उभारण्यात आले आहे. याठिकाणी विविध विभागांचे कामकाज प्रशस्त जागेत सुरू होईल. या विस्तारामुळे सभासद, खातेदार, कर्जदार, ठेवीदारांना अधिक चांगली सेवा निश्चित मिळेल असा विश्वास मर्चंटस बँकेचे



संचालक किशोर गांधी यांनी व्यक्त केला. अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेच्या दाळमंडई येथील विस्तारीत हेड ऑफीस अनेक्सचा शुभारंभ अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर संचालक किशोर गांधी व संजय बोरा यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक सीए आयपी अजय मुथा, किशोर मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष बायड, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य राजेश झंवर, सीईओ सुनील पुराणिक, जॉइंट सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ग्रामीण एआय समिट २०२६ अहिल्यानगर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''एआय भारताचे भविष्य घडवत आहे. अहिल्यानगर जिल्ह्याची ''एआय व स्टार्टअप'' क्षेत्रात देशाच्या नकाशावर ठळकपणे उदयास येण्याची क्षमता आहे,'' असे प्रतिपादन नितीन उदमले यांनी करत ग्रामीण भागात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी मोठा पुढाकार घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथे ''ग्रामीण एआय समिट २०२६'' चे आयोजन करण्यात आले आहे.

ही समिट नितीन उदमले फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आले असून द डेटा टेक लॅब्स, पुणे हे सह-आयोजक आहेत. शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९:०० ते सायं. ५:०० या वेळेत माऊली संकुल, सावेडी, अहिल्यानगर येथे हा समिट पार पडणार आहे.

समिटच्या उद्घाटन समारंभाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. यामध्ये मा. संग्राम भैया जगताप (आमदार), मा. सोमनाथजी घार्गे (जिल्हा पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर ), मा.आनंद भंडारी () (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर ), मा. शरदजी जरे (संचालक, कृषी विपणन, महाराष्ट्र राज्य), डॉ. अमितजी आंद्रे (संस्थापक-, द डेटा टेक लॅब्स, पुणे ), मा. सुधाकरजी बोराळे (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी), मा. राजेंद्रजी पाटील (कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी), मा. विजयजी मुळीक (अतिरिक्त मुकाअ , जिल्हा परिषद) तसेच मा.वैभवजी कलुबर्मे (अतिरिक्त पोलीस अधीक्षक) यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९:०० ते ९:३० या वेळेत नोंदणी व नेटवर्किंग सत्राने होणार असून त्यानंतर ९:३० ते १०:३० या वेळेत उद्घाटन समारंभ पार पडणार आहे.

यानंतर विविध तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली एआय विषयावर सखोल सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.सकाळच्या सत्रात डॉ. अमित आंद्रे हे ''ग्रामीण एआय: ''डिजिटल समावेशनातून बुद्धिमान सक्षमीकरणाकडे'' या विषयावर मार्गदर्शन करणार असून, 'डिजिटल इंडिया' पासून 'इंटेलिजेंट इंडिया' कडे होत असलेल्या प्रवासाची सविस्तर माहिती देणार आहेत.

यानंतर श्री. रवींद्र पाल सिंग (संचालक, , पुणे) हे ''एआयचा नैतिक वापर, डेटा सुरक्षा आणि जबाबदार तंत्रज्ञान'' या महत्त्वपूर्ण विषयावर विचार मांडणार आहेत.

तसेच डॉ. आनंद कुलकर्णी हे ''औद्योगिक क्रांतीतील एआय आणि संधी'' या विषयावर मार्गदर्शन करणार असून उद्योग क्षेत्रातील एआयचे वाढते महत्त्व अधोरेखित करणार आहेत.

त्यानंतरच्या सत्रात डॉ. स्मिता काळे या ग्रामीण भागातील उद्योजकांसाठी एआयच्या माध्यमातून नवीन व्यवसाय संधी कशा निर्माण होऊ शकतात यावर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.


दुपारच्या सत्रात पुन्हा एकदा डॉ. अमित आंद्रे हे ''फिल्म मेकिंग, जाहिरात आणि सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये एआय'' या विषयावर मार्गदर्शन करणार असून कंटेंट क्रिएटर्स आणि इन्फ्लुएन्सर्ससाठी एआयच्या संधी स्पष्ट करणार आहेत.

यानंतर डॉ. निरंजन देशमुख हे आरोग्य क्षेत्रातील एआयच्या वापरावर प्रकाश टाकणार आहेत.

श्री. अमित सिंग (संस्थापक , नवी दिल्ली) हे ''एआयच्या वापरातून फायदेशीर स्टार्टअप्स व ग्रामीण रोजगार'' या विषयावर मार्गदर्शन करणार असून ग्रामीण युवकांसाठी नवीन संधींचे दालन उघडणार आहेत. शेवटच्या सत्रात श्री. सचिन पांचाळ (कृषी अधिकारी) हे ''एआय आणि कृषि '' या विषयावर मार्गदर्शन करणार असून आधुनिक शेतीत एआयचा वापर कसा उपयुक्त ठरतो याचे उदाहरणांसह विवेचन करणार आहेत.

हा समिट केवळ तांत्रिक चर्चेपुरता मर्यादित नसून ग्रामीण भागातील युवक, शेतकरी, विद्यार्थी आणि उद्योजकांसाठी नव्या संधींचा नवा अध्याय ठरणार आहे. एआयच्या माध्यमातून शेती, आरोग्य, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता या समिटमुळे निर्माण होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी, विशेषतः युवक, शेतकरी व उद्योजकांनी या समिटमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक नितीन उदमले फाऊंडेशन च्या वतीने केले आहे.

# प्रसिद्ध कवी आणि रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प्रसिद्ध कवी आणि प्रसिद्ध रामकथाकार डॉ. कुमार विश्वास हे माजी आम. स्व.अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आयोजित '' अपने-अपने राम'' या संगीतमय रामकथेच्या निमित्ताने अहिल्यानगरमध्ये आले असता जगभरातील १२३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या अहिल्यानगर सेवाकेंद्राच्या सहसंचालीका व सुप्रसिद्ध प्रेरक वक्ता ब्रह्माकुमारी सुप्रभा दीदी व १८४ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ दीपक हरके यांनी त्यांची भेट घेऊन ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली.

ध्यानधारणे बद्दल माहिती देताना बी.सुप्रभा दीदी यांनी सांगितले की राजयोग ध्यान हा ध्यानाचा एक प्रकार आहे जो सर्व पार्श्वभूमीच्या लोकांसाठी प्रवेश योग्य आहे. हे विधी किंवा मंत्रांशिवाय एक ध्यान आहे आणि कधीही कुठेही सराव करता येतो. राजयोग ध्यानाचा सराव उघड्या डोळ्यांनी केला जातो, ज्यामुळे ध्यानाची ही पद्धत बहुमुखी, सोपी आणि सराव करण्यास सोपी बनते. ध्यान ही त्या ठिकाणी असण्याची अवस्था आहे जी दररोजच्या चेतनेच्या पलीकडे असते, जिथे आध्यात्मिक सशक्तीकरण सुरू होते. आध्यात्मिक जागरूकता आपल्याला नकारात्मक आणि व्यर्थ विचारांपेक्षा चांगले आणि सकारात्मक विचार निवडण्याची शक्ती देते. आम्ही परिस्थितींवर प्रतिक्रिया देण्याऐवजी त्यांना प्रतिसाद देऊ लागतो. आपण सुसंवादाने जगू लागतो, आपण अधिक चांगले आणि आनंदी, निरोगी संबंध निर्माण करतो आणि आपले जीवन सर्वात सकारात्मक मार्गाने बदलतो.

# नेवासा स्टोनमुळे आधुनिक बांधकामाला नवी दिशा; इंजि. श्रेयस दरे यांचे प्रभावी मार्गदर्शन

**पारंपरिक दगडातून मॉडर्न स्पेस डिझाईनची आकर्षक मांडणी; तंत्रज्ञान व सौंदर्याचा संगम । स्थानिक नैसर्गिक दगडाचा नाविन्यपूर्ण वापर; बांधकाम क्षेत्रात नवे पर्याय खुले**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा प्रभावी वापर करून आधुनिक बांधकाम अधिक आकर्षक, टिकाऊ आणि पर्यावरणपूरक बनवता येते, याचे उत्कृष्ट उदाहरण श्रेयस दरे यांनी सादर केले. आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर आणि मे. आर.एच. दरे यांच्या संयुक्त विद्यमाने ''पारंपरिक दगडाचा वापर करून मॉडर्न स्पेस डिझाईन'' या विषयावर व्याख्यान व गॅलरी व्हिजिटचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात श्रेयस दरे यांनी त्यांच्या 'औरम बिझिनेस हब' येथील नेवासा स्टोन गॅलरीमध्ये प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून नेवासा स्टोनचा विविध प्रकारे वापर कसा करता येतो, याचे सखोल व प्रभावी मार्गदर्शन केले. निंबळक येथील खाणीतून काढण्यात येणाऱ्या बसाल्ट रॉकवर अत्याधुनिक प्रक्रियेच्या माध्यमातून काम करून त्याचा इनडोअर तसेच आउटडोअर बांधकामात



कल्पक व दर्जेदार वापर करण्याचे विविध पर्याय त्यांनी दाखवून दिले.

या गॅलरीमध्ये वॉल टाईल्स, फ्लोअरिंग, पिलर, फाऊंटन, शोपीस, पुतळ्याचे फाउंडेशन अशा विविध स्वरूपात नेवासा स्टोनचा वापर सादर करण्यात आला. मॉडर्न स्पेस डिझाईन करताना पारंपरिक दगडाचा योग्य ठिकाणी आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास सौंदर्य आणि टिकाऊपणा कसा वाढतो, याचे प्रत्यक्ष डेमो उपस्थितांनी अनुभवले.

यावेळी बसाल्ट स्टोन भिंतीवर लावण्याचे विविध प्रकार, फ्लोअरिंगचे पर्याय, मोल्डिंग तंत्रज्ञान, स्विमिंग पूल कोपिंग, फ्लेम फिनिश, कोर्स अशलार कंपोझिट मेशनरी, स्टोन कॉलम, नेम स्टोन, स्टोन बलार्ड, कर्ब, फाउंडेशन आणि प्लांटर यांसारख्या विविध उपयोगांवर सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच प्रेझेंटेशनच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रकल्पांमध्ये या दगडाचा प्रभावी वापर कसा करता येईल, याची ठोस उदाहरणे सादर करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष अभिजित देवी यांनी सांगितले की, ''संस्थेच्या वतीने प्रथमच दालन भेट आणि प्रॉडक्ट प्रेझेंटेशन असा संयुक्त उपक्रम राबविण्यात आला असून सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.'' त्यांनी पुढे नमूद केले की, दरे कुटुंबीयांची तिसरी पिढी खडी क्रशर आणि नेवासा स्टोनवर विविध प्रयोग करत असून, निसर्गाशी सुसंगत व पर्यावरणपूरक उत्पादने विकसित करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. पूर्वी अशा प्रकारच्या उच्च दर्जाच्या दगडी उत्पादनांसाठी राजस्थान किंवा दक्षिण भारतातील बाजारपेठांवर अवलंबून राहावे लागत होते; मात्र आता अहिल्यानगरमध्येच या सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक आर्किटेक्ट, अभियंते आणि बांधकाम व्यावसायिकांसाठी हा मोठा दिलासा ठरत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात अमेय कुलकर्णी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यक्रमास प्रा. दीपक दरे, उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, तसेच विविध क्षेत्रातील अभियंते, आर्किटेक्ट आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनसंख्या वाढवून अहिल्यानगर,महाराष्ट्र तसेच भारत देशात इस्लामीकरण करण्याचे षडयंत्र - सुरेश चव्हाणके

**श्रीराम मंदिर येथे विराट हिंदू संमेलनात उस्फूर्त प्रतिसाद**




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हिंदुस्थानावर हिरवा झेंडा फडकवणाऱ्या औरंगजेबाला येथे मारण्यात आले. औरंगजेबाचे हाडे देखील या भूमीत पुरु दिली नाहीत. संभाजीनगर येथे त्याचे थडगे करावे लागले.एवढे शूरवीर अहिल्यानगरचे वंशज होते.

शरद पवार यांच्या पार्टीचे प्रवक्ते वारकरी संत संप्रदायातील लोकांना घुसखोर म्हणतात.त्या शरद पवारांना महाराष्ट्रात घुसलेले ८० लाख

बांगलादेशी,रोहिंगे,पाकिस्तानी घुसखोर दिसत नाही का? वारकरी संप्रदायाला घुसखोर म्हणल्यास हिंदू समाज खपवून घेणार नाही.ज्या वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोठे योगदान दिले आहे.वारकरी संप्रदायामुळे येथील आत्महत्या थांबल्या आहेत.समाजात दारू पिणाऱ्यांचे प्रमाण कमी होऊन व्यसनमुक्ती झाली आहे.वारकरी संप्रदायातील संत हे आमच्यासाठी सर्वश्रेष्ठ आहेत.

पूर्वी अहिल्यानगर मध्ये हिंदू बहुल असणारे मुकुंदनगर, गोविंदपुरा झेंडीगेट,आलमगीर परिसर आता हिंदू अल्पसंख्यांक झाला आहे.महाराष्ट्रात सर्वाधिक लव जिहाद च्या केसेस अहिल्यानगर येथे घडलेल्या आहेत.ही गंभीर बाब प्रशासनाने लक्षात घ्यावी.

भारताने १९५२ साली हम दो हमारे दो हा नारा दिला होता. कायदा केला नव्हता तरीही हिंदूंनी वेदमंत्राप्रमाणे त्याचे पालन केले.हिंदूंचा जन दर कमी होत चालला आहे.ही चिंतेची बाब आहे.

देशाच्या फाळणीनंतर पाकिस्तान,अफगाणिस्तान,तुर्की या मुस्लिम राष्ट्रांची लोकसंख्या चार पटीने वाढली आहे.याउलट भारतामधल्या मुस्लिमांची लोकसंख्या दहा पटीने वाढली. हे अगदी सहज झाले नाही. जनसंख्या वाढवून अहिल्यानगर,महाराष्ट्र तसेच भारत देशात इस्लामीकरण करण्याचे षडयंत्र आहे.असे प्रतिपादन हिंदुत्ववादी प्रखर वक्ते व सुदर्शन न्युज चैनल चे मुख्य संपादक सुरेश चव्हाणके यांनी केले आहे.

नवी पेठ येथील श्रीराम मंदिर येथे कोहिनूर व परशुराम वस्ती यांच्या वतीने विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.डाळ मंडई येथील प्रभू श्रीराम मंदिर येथून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.या शोभायात्रेत प्रभू श्रीरामाची भव्य मूर्ती,लाठी काठी तलवारबाजी करणाऱ्या मुली हे शोभायात्रेचे मुख्य आकर्षण ठरले. या मिरवणुकीत हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.या शोभायात्रेचा समारोप नवी पेठ येथील श्रीराम मंदिर येथे करण्यात आला.यानंतर विराट हिंदू संमेलनालात प्रखर हिंदुत्ववादी वक्ते व सुदर्शन न्यूजचे मुख्य संपादक सुरेश चव्हाणके,ह.भ.प.गोविंद शास्त्री मुकुंद काका जाटदेवळेकर व पश्चिम महाराष्ट्र प्रांत कुटुंब प्रबोधन प्रमुख नरेश करपे यांनी सभेला उद्बोधन केले.याप्रसंगी हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. हभप गोविंद शास्त्री जाटदेवळेकर महाराज म्हणाले, हिंदूंना जागृत करण्यासाठी देशात लाख सव्वा लाख विराट संमेलने झाली.ही संमेलने यशस्वी झाल्याची पावती वारकरी संप्रदायातील संतांना घुसखोर म्हणणाऱ्यांनी दिली आहे.महाभारतामध्ये विदुरांचा अपमान करणारे कौरव नेस्तनाबूत झाले.रामायणात विभिषणाचा अपमान करणाऱ्या रावणाचा विध्वंस झाला.अनेकांनी रामाला काल्पनिक ठरवले तरीदेखील प्रभु श्रीरामाने त्यांना इंगा दाखविला नाही.परंतु आता मात्र वारकरी संप्रदायातील संतांना घुसखोर ठरविले तर त्यांना प्रभू रामचंद्र व परमात्मा श्रीकृष्ण दोन ते तीन वर्षात काय इंगा दाखवतील हे कळेलच.हिंदू समाजात जागृती करण्यासाठी कृतिशीलतेचा भाग करावयाचा असेल तर आणखी मोठ्या प्रमाणात हिंदू संमेलने करावीत.

# तथागत प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**प्रतिष्ठान १५० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्विकारणार**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** तथागत प्रतिष्ठानच्या वतीने रामवाडी, कोठला परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डिजेच्या अनावश्यक खर्चाला फाटा देत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना वह्या व स्कूल बॅगचे वितरण करण्यात आले. जीएसटी कमिशनर विवेक घोडके, मतीन शेख, नवनाथ गवळी, आदित्य येलमाने, स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीचे नेते प्रतीक बारसे, सुजय म्हस्के, संजय कांबळे, सुजित घंगाळे, सागर चाबुकस्वार, अविनाश कांबळे, नादीर शेख, प्रवीण ओरे, सुरेश पानपाटील, विजय शिरसाठ, स्वप्नील साठे, जमीर सय्यद, योहान चाबुकस्वार, जावेद सय्यद, नईम शेख, आरपीआय महिला घाडीच्या ज्योती पवार, सविता भालेराव, सारिका साळवे, शीतल नाटिकर, अर्चना गायकवाड, विश्रांती पठारे, तथागत प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत म्हस्के, तुषार गायकवाड, संपदा म्हस्के, सुयश काळे, उमेश गायकवाड, सुशीला म्हस्के, मनीषा गायकवाड , संजना गायकवाड, माधवी म्हस्के, हर्षल म्हस्के, ॲड. कार्तिक म्हस्के, साकेत गायकवाड, हर्षल पेंढारकर, आकाश काळे, शहेबाज शेख, सचिन बाबणी, सुनिल भोसले, विशाल व्यवहारे, विकी प्रभळकर, संजय साळी आदी कार्यकर्ते व विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जीएसटी कमिशनर विवेक घोडके म्हणाले की, ''तथागत प्रतिष्ठानच्या माध्यमातून कार्यकर्ते आंबेडकरी विचाराने प्रेरित होऊन कार्य करत आहेत. समाजात आंबेडकरी चळवळ सक्रियपणे राबवली जात असून, युवक मोठ्या प्रमाणात समाजकार्यात सहभागी होत आहेत. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा बाबासाहेबांचा विचार समाजात रुजविण्याचे कार्य अशा उपक्रमांमधून घडत आहे. शिक्षणातूनच खऱ्या अर्थाने परिवर्तन शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

सुशांत म्हस्के म्हणाले की, ''तथागत प्रतिष्ठान दरवर्षी वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देत आहे. आगामी काळात स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात टॅलेंट असूनही योग्य दिशा नसल्यामुळे ते मागे पडतात. त्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शन देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रतिक बारसे म्हणाले की, ''वंचित आणि शोषित घटकातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःमध्ये बदल घडवून आणला पाहिजे. शिक्षण हेच यशाचे खरे साधन असल्याचे स्पष्ट केले.

सुजय म्हस्के यांनीही आपल्या मनोगतात सांगितले की, ''सर्वसामान्य घटकातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी क्षमता आहे, मात्र योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे ते पुढे जाऊ शकत नाहीत. अशा उपक्रमांमधून त्यांना दिशा देण्याचे कार्य होत असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमात तथागत प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरजू कुटुंबातील १५० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्याची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थी शिक्षित व्हावा आणि सर्वसामान्य कुटुंबातून अधिकारी घडविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. यासाठी प्रतिष्ठानच्या माध्यमातून भविष्यात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचा मानस देखील व्यक्त करण्यात आला.

# प्रसूतीदरम्यान महीलेचे मृत्यू; पाचोडमधील घटनेने खळबळ

**अतिरक्तस्त्रावामुळे प्रकृती गंभीर; घाटी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू । एमएलसी नोंद, पोलिसांची हालचाल सुरू**




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** तालुक्यातील पाचोड येथे प्रसूतीदरम्यान घडलेल्या दुर्दैवी घटनेत सायमा अल्ताफ शेख (रा. खांदगाव, ता. पैठण) यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सायमा शेख यांना प्रसूतीसाठी पाचोड येथील शिफा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. प्रसूतीनंतर अचानक मोठ्या प्रमाणात अंतर्गत रक्तस्त्राव सुरू झाल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक बनली. परिस्थिती गंभीर होताच त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, या प्रकरणाची एमएलसी (मेडिको-लीगल केस) पाचोड पोलिसांना प्राप्त झाली असून, घटनेचा पंचनामा करण्यासाठी पोलीस कर्मचारी घाटी रुग्णालयात दाखल झाले असल्याची प्राथमिक माहिती आहे.

या घटनेमुळे दोन लहान मुलांचे मातृछत्र हरपले असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. ग्रामीण भागात काही ठिकाणी बीएचएमएस, बीएएमएस डॉक्टरांकडून महिलांवर अवैधरित्या शस्त्रक्रिया होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

(पान १ वरून)

## नियमबाह्य पद्धतीने सभासदत्व नाकारणाऱ्या मर्चंटस बँकेला सहकार आयुक्तांचा दणका

नियमबाह्य कारभाराला पुन्हा एकदा कायद्याने चपराक बसली आहे. सभासदत्व मिळण्यासाठी योग्य नियमाखाली अर्ज करूनही तो संचालक मंडळ नियमबाह्य पद्धतीने फेटाळून लावतात. परंतु यापूर्वीही अशाच प्रकरणात बँकेविरूद्ध निकाल आले आहेत. चेअरमन व संचालक मंडळाला मर्चंटस बँक ही सहकार कायद्यानुसार चालते याचा विसर पडला आहे. खाजगी मालकीची संस्था असल्या सारखा कारभार करण्यात येतो. बँकेचे सीईओ गलेलठ्ठ पगार घेऊनही नियमबाह्य कारभाराला पाठबळ देतात हे दुर्दैव आहे. सहकार कायद्यातील नव्या तरतुदीनुसार आता बँकेचे विद्यमान चेअरमन तसेच बहुतांश संचालक पुढची निवडणूक लढवू शकत नाहीत. त्यामुळे मनमानी कारभार वाढला आहे. एखाद्याला सभासदत्व दिले तर विरोधकांची एकजूट होऊन निवडणुकीत बदल घडवेल असा हास्यास्पद युक्तिवाद बँकेकडून केला जातो. वास्तविक बँकेचे सुमारे २२ हजार सभासद आहेत. एखादा व्यक्ती सभासद झाला तर तो इतका मोठा बदल कसा करू शकतो हे एकदा त्यांनी सांगितले पाहिजे. दरवेळी नियमबाह्य पद्धतीने कारभार करून कोर्ट कचेरीसाठी वकिलांना लाखो रुपये फी अदा केली जाते. हा अनाठायी खर्च बँकेचा असतो. वास्तविक हा खर्च चेअरमन व संचालक मंडळाकडून वसूल केला पाहिजे, अशी मागणी राजेंद्र चोपडा यांनी केली आहे.

## रस्ते अपघात रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करा

क्षण : ड्रोन सर्वेक्षणासह प्रत्येक महामार्गाचा नियमित आढावा घेणे बंधनकारक,
४) जिल्हा स्तरावर टास्क फोर्स : प्रत्येक जिल्ह्यात 'हायवे सेफ्टी टास्क फोर्स' स्थापन करून दर पंधरवड्याला बैठक,
५) आपत्कालीन सेवा सुधारणा : प्रत्येक ७५ किमी अंतरावर ॲम्ब्युलन्स आणि क्रेनची व्यवस्था,
६) ट्रक ले-बाय सुविधा : ट्रक चालकांसाठी विश्रांती केंद्रे उभारण्याचे निर्देश,
७) ब्लॅकस्पॉट ओळख व उपाययोजना : अपघातप्रवण ठिकाणांची यादी जाहीर करून तेथे प्रकाशयोजना व सुरक्षा उपाय बंधनकारक,८) नागरिकांसाठी तक्रार व्यवस्था - महामार्गांवरील अतिक्रमण व समस्यांसाठी 'राजमार्गयात्रा' ॲप आणि टोल-फ्री क्रमांक १०३३ सक्रिय करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

अशाप्रकारे न्यायालयाने कठोर भूमिका घेत स्पष्ट केले की, देशातील केवळ २% रस्ते असलेल्या राष्ट्रीय महामार्गांवर सुमारे ३०% मृत्यू होतात, ही अत्यंत गंभीर बाब आहे. नागरिकांच्या सुरक्षित प्रवासाचा हक्क हा संविधानातील कलम २१ अंतर्गत मूलभूत अधिकार असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

''मानवी जीवितापेक्षा कोणतेही आर्थिक किंवा प्रशासकीय कारण मोठे असू शकत नाही,'' असेही न्यायालयाने स्पष्ट करत सर्व संबंधित यंत्रणांना दिलेल्या मुदतीत आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

या आदेशाच्या अनुषंगाने रहदारी समस्येचे अभ्यासक अभय ललवाणी यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधून प्रभावी अंमलबजावणीची मागणी केली आहे.

## आ. दातेंच्या नेतृत्वावर विश्वास

यावेळी आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले ''राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा तळागाळातील कार्यकर्त्यांचा पक्ष असून, येथे प्रत्येकाला काम करण्याची आणि पुढे जाण्याची समान संधी आहे. मतदारसंघातील सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामे राबविणे हीच आमची खरी ओळख आहे.''

''पक्षात नव्याने येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान राखत त्यांच्या माध्यमातून गावागावात विकासाची गती वाढवण्याचा आमचा प्रयत्न राहील. अळकुटी परिसरातही विकासकामांना आणखी वेग देत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.'' या प्रवेशामुळे अळकुटी परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद अधिक बळकट झाली असून, स्थानिक पातळीवर संघटनात्मक बांधणीस नवी ऊर्जा मिळणार आहे. आ. दाते सर सर्वसामान्यांना न्याय देणारे नेतृत्व आहे, प्रामाणिक नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षप्रवेश केला आहे. विकास, पारदर्शकता असल्याने आ. दाते यांच्या नेतृत्वाखाली पुढे वाटचाल करणार असुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बळकट करण्यासाठी काम करणार.

सुरेश परंडवाल, सामाजिक कार्यकर्ते

## भरता प्रमणे भाऊ अपेक्षित असेल तर स्वतः आधी राम व्हा - रामकथाकार डॉ. कुमार विश्वास

तरी त्यांच्या सामाजिक कामाचे यश सर्वांच्या मनात आहे. स्वतःसाठी प्रत्येक जण जगतोच पण समाजासाठी जगणाऱ्यांना मनातून मान सन्मान मिळतो, असेही ते म्हणाले. मुलांनी कोणतेही वाईट पाउल उचलू नये म्हणून त्यांच्याशी सतत संवाद हवा, त्यांना वेळ द्यायला हवा. करोनाने जीवनाची नश्वरता दाखवली आहे, त्यामुळे उद्या काय घडणार हे कोणी काही सांगू शकत नाही. मृत्यूनंतर नाव व नातेसंबंध गळून पडतात. आजचा दिवस आनंदात व समाजपयोगी कार्यात व्यतीत करून समाज मनात चिरंतन राहणे महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी आवर्जून स्पष्ट केले.

प्रारंभी देशात गाजलेल्या गायकांनी सादर केलेल्या अनेक अवीट गोडीच्या भजनांमध्ये उपस्थित भाविक तल्लीन झाले. डॉ. विश्वास यांनीही अनेक भजने गाऊन वातावरण भक्तीमय केले.